
# राजर्षी शाहू बँकेत सायबर जनजागृती; ऑनलाइन फसवणुकीपासून बचावाचे मार्गदर्शन

**पुणे (प्रतिनिधी)**

रॉयल मिडिया न्यूज

क्विक हील फाऊंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा २०२६' उपक्रमांतर्गत राजर्षी शाहू सहकारी बँक लिमिटेड, हडपसर शाखेत सायबर जनजागृती अभियान उत्साहात पार पडले. या अभियानात बँकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि डिजिटल सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



हडपसरमधील अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स पल्लवी देरकर व श्रेया शिंदे यांनी ऑनलाइन फसवणूक, मजबूत पासवर्डचे महत्त्व, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, डिजिटल गोपनीयता, सायबर गुन्ह्यांपासून बचाव आणि सुरक्षित इंटरनेट वापर याविषयी माहिती दिली. शाखा अधिकारी रवींद्र सावंत व सुनील देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात संशयास्पद लिंक, बनावट संदेश, ओटीपी फसवणूक, सायबर बुलिंग आणि ऑनलाइन आर्थिक फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याची प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यात आली.

प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य प्रशांत मुळे, उपप्राचार्या शुभांगी औटी, संगणकशास्त्र विभागप्रमुख विलास वाणी आणि प्रा. मनिषा गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. बँकेच्या पदाधिकाऱ्यांनी सायबर वॉरियर्सच्या कार्याचे कौतुक करून भविष्यातही अशा जनजागृती उपक्रमांची गरज अधोरेखित केली.